**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०१**

मी शपथेवर सत्यकथन करतो की,

माझे नाव – महादेव सुदाम ढाणे,

वय:– ३७ वर्षे, धंदा:–शेती,

राहणार:– ढाणेवस्ती सातेफळ, ता. जामखेड, जि. अहमदनगर

**<u>प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांचा उलटतपास वादीचे सुविद्य विधिज्ञ श्री. एस. एन. बोरा यांचे मार्फत शपथेवर सुरु –</u>**

**०१.** हे म्हणणे खरे आहे की, प्रत्येक गटामध्ये सहहिस्सेदार असतात व ते आपआपल्या क्षेत्रामध्ये वहिवाट करतात. हे म्हणणे खरे आहे की, शेतकरी हा त्याच्या क्षेत्रामध्ये बांध बांधणी करतो. हे म्हणणे खरे आहे की, ७/१२ उताऱ्यावर व प्रत्येक्षात देखील सहहिस्सेदाराचे क्षेत्र हे वेगवेगळे असते. हे म्हणणे खरे आहे की, एखादे क्षेत्र हे सामायिकात किंवा आणेवारीमध्ये दर्शविलेले असेल तर त्या संबंधीत क्षेत्रावर गेल्यानंतर सदरचे क्षेत्र हे सामायिकात किंवा आणेवारीमध्ये असल्याचा बोध होतो.

**(साक्षीदाराची तब्येत ठिक नसल्याने, त्यांच्या तोंडी विनंती वरुन उर्वरित उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येत आहे.)**

श्रवणोत्तर स्वीकृती,
समक्ष,

सही/–

**(अनुश्री ब. फंड)**
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
जामखेड.

दिनांक:– ०८/०१/२०२६
ठिकाण:– जामखेड

**(साक्षीदाराचा जबाब त्याने सांगितल्याप्रमाणे नोंदविला)**